विद्यार्थ्यांची आकडेवारी वाढली. या परीक्षेत आता अनेक स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थीही उतरले आहेत, असे डॉ.हामीद खान यांनी सांगितले.

मोठे व्यासपीठ मिळाले होते. मात्र या नाट्यगृहाच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चामुळे मनपाच्या तिजोरीवर बोजा पडत होता. हे नाट्यगृह

आता शिस्तप्रिय मनपा आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर काय कार्यवाही करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बालपणापासून पर्यावरणाशी नाते जोडणारे प्रियानंद आगळे

**गिरीश काळेकर**

**औरंगाबाद-** समाजात खुर्ची आणि प्रतिष्ठा जपणारी अनेक पाहायला मिळतात. परंतु पदाची ना कोणत्या प्रतिष्ठेची आस न ठेवणारे अन् पर्यावरणाशी नाते जोडणारे प्रा. प्रियानंद आगळे यांचे व्यक्तीमत्व दुसऱ्यांना लाजवणारे ठरत आहे.

शहरातील सिडको भागात वास्तव्यास असणारे प्रा.प्रियानंद आगळे. प्राथमिक शिक्षण घेताना त्यांचे मन पर्यावरणात रमत असल्यामुळे अनेक शाळांतून त्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात प्रवेश घेऊन जवळच असलेल्या बिबी का मकबरा येथील झाडांच्या सानिध्यात अभ्यास करत. त्यानंतरचे महाविद्यालयीन शिक्षण नागसेनवनच्या मिलिंद महाविद्यालयात घेऊन शासकीय तंत्रनिकेतनमध्ये स्थापत्य अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. परंतु मनापासून पर्यावरणवादी असल्यामुळे प्रा. आगळे यांनी शिक्षण चालू असताना भित्तीपत्रकाच्या सादरीकरणातून पर्यावरणाचे विषय हाताळले. ते म्हणतात की, पर्यावरणाशी एकरूप असल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी व्ही.राधा यांच्या मार्गदर्शनाखाली बिबी का मकबराच्या पाठीमागील वीटभट्टया उठविल्या. तसेच अभियांत्रिकीच्या शिक्षणात 'सोलार हॉऊसिंग' ही संकल्पना मांडली. प्रियानंद यांनी शिक्षणाबरोबरच झोपडपट्टीतील मुलांना शिकविण्याचा विडा उचलला होता. बेगमपुरा परिसरातील अनेक मुलांना त्यांनी शिक्षणाबरोबरच रेसिंगचे धडे दिले.



इंजीनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षाला असताना महाराष्ट्रात पहिल्यांदाच गोदावरी नदीच्या पात्रातील पाण्याचे नमुने घेऊन सर्वेक्षण करण्याचे काम केले. मनात जिद्द असल्यास यश गाठणे सहज शक्य होत असते. अशाच पध्दतीने त्यांनी पुढे महाविद्यालयीन स्तरावर तरूणांना पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जोडण्याचे काम केले. पर्यावरणाविषयक काम करीत असताना ते सांगतात की, विद्यापीठ, शासकीय महाविद्यालय, पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापकाचे काम सांभाळले. त्यामधूनही पर्यावरणाशी निगडीत वेगळा वर्ग तयार झाल्याचे सांगतात. प्रा. प्रियानंद आगळे यांना पर्यावरणासंबंधी काम करणारे हात मिळाल्याने त्यांनी २००५ साली इको नीड्स फांऊडेशन सुरू केले.

त्यांच्या प्रदीर्घ अनुभवातून सलीम अली सरोवर, नेहरू तलाव, परसोडा याठिकाणी पाझर तलाव, विद्यापीठ परिसरातील सोनरी महलाच्या पाठीमागील बंधारे, नागसेनवनात वृक्षारोपणाचे कार्य केले. मनामध्ये प्रतिष्ठेची इच्छा न बाळगता पर्यावरण हाच माझा धर्म असे समजणारे प्रा.प्रियानंद आगळे यांचे व्यक्तीमत्व 'आगळे' असेच आहे. त्यांना सुरूवातीला घरातून आई-वडीलांचा अशा कामासाठी विरोध होता. मात्र त्यांनी घरच्यांना करीत असलेल्या कामाचे महत्व पटवून दिले. मुंबईत व्हिजेटीआय महाविद्यालयात प्राध्यापक असताना पर्यावरणाच्या कामासाठी वेळ मिळत नसल्यामुळे त्यांनी नोकरी सोडली. आज प्रा. आगळे इको नीडस्‌चे अध्यक्ष असून इको रियोल्युशनच्या अंतर्गत काम करीत आहेत. महाराष्ट्रातच नव्हे तर कॅनडा, इराण, अमेरिका, अर्जेंटिना, श्रीलंका, नेपाळ, जकार्ता, यु.के., जपान, कोरिया, लिबिया या जागतिक स्तरावरील देशातही ते पर्यावरण संबंधी काम पाहतात. प्रा.प्रियानंद आगळे त्यांच्या पगारातूनच पर्यावरणाचे काम करीत आहेत. त्यांच्या अशा कार्याला युनेस्कोने वॉटर ॲवॉर्ड, ग्लोबल वॉटर पार्टनरशिप यांचा लाईफ टाईमसाठी सहभाग करून घेतला आहे.

पर्यावरणाचा जिव्हाळा असणारे प्रा. आगळे आज पूर्णपणे पर्यावरणप्रेमी झाले असून उस्मानाबाद, बुलढाणा, सूरत, मध्यप्रदेश, शिर्डी, श्रीलंका, इंदोर, दिल्ली याठिकाणी पर्यावरणावर मार्गदर्शन करीत आहेत. आज जागतिकस्तरावर पर्यावरणावर जनजागृती करणारे प्रा. आगळे यांनी आपला 'वेगळा' ठसा उमटविला आहे.